# महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ
## साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

दूरध्वनी : ०२०-२५५३४८६० ई-मेल : info@mahanhm.in


जा.क्र.मराफऔवमं/क्षेत्रवि/ड्रॅगनफ्रुट/मासु./३६०२०/२०२१
पुणे-५, दि.२९/१०/२०२१

प्रति,

1. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
2. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)

**विषय :- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत विदेशी फळपिक ड्रॅगन फ्रुट लागवड या घटकाच्या मार्गदर्शक सुचना निर्गमित करणेबाबत…**

**संदर्भ :-**
1. केंद्र शासनाचे पत्र क्र.एफ.क्र.३३-४/२०२०-एमआयडीएच (एएपी), दिनांक- ५ एप्रिल, २०२१
2. राज्य शासनाचे पत्र क्र.एफ.क्र.३३-४/२०२०-एमआयडीएच (एएपी), दिनांक- ५ एप्रिल, २०२१
3. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.मराफऔंवम/२७००६/२१, दि. १८/०८/२०२१
4. मा. व्यवस्थापकीय संचालक, मराफऔंवम,पुणे यांचे दि.28/10/2021 रोजीची मंजुर टिपणी.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, ड्रॅगनफ्रुट (कमलम) हे एक निवडुंग परिवारातील अत्यंत महत्वपुर्ण फळ आहे. ड्रॅगनफ्रुट या फळामध्ये अधिक प्रमाणात उपलब्ध असणारे पोषकतत्व आणि ॲन्टीऑक्सींडंन्टमुळे या फळास सुपर फ्रुट म्हणुन प्रसिध्दी मिळत आहे. तसेच या फळात विविध औषधी गुण सुद्धा आहेत. या व्यतिरीक्त या फळामध्ये फॉस्फरस व कॅल्शीयम या सारखे मिनरल्स अधिक प्रमाणात आढळतात. पाण्याची टंचाई निर्माण झाली तरी ही झाडे कायमची टिकुन राहतात. तसेच या पिकामध्ये रोग व किडींचा प्रादुर्भाव नगण्य असुन पिक संरक्षणावर जास्त खर्च येत नाही. भारतीय बाजारपेठेमध्ये या फळाची मागणी वाढत आहे. या फळाचे क्षेत्र, मागणी, निर्यातक्षमता, औषधी व पोषक मुल्य इ. बाबी लक्षात घेवुन सन २०२१-२२ या वर्षापासुन एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातुन ड्रॅगनफ्रुट लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

सदर फळपिकाच्या लागवडीकरीता मार्गदर्शक सुचना सोबत जोडुन पाठविण्यात येत आहेत. त्यानुसार, सुचनांचा काटेकोरपणे अवलंब करून एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत ड्रॅगनफ्रुट लागवड कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. सदरच्या मार्गदर्शक सुचना कृषि विभागाच्या https:/krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(मा. व्यवस्थापकीय संचालक,मराफऔंवमं,पुणे यांचे मान्यतेने).

(डॉ.के.पी.मोते)
**संचालक**
**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि**
**औषधी वनस्पती मंडळ, पुणे**

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान

# क्षेत्रविस्तार

अंतर्गत

# ड्रॅगनफ्रुट (कमलम) लागवड कार्यक्रम

# मार्गदर्शक सुचना

# ड्रॅगनफ्रुट (कमलम) लागवड

## प्रस्तावना

ड्रॅगनफ्रुट (कमलम) हे एक निवडुंग परिवारातील अत्यंत महत्वपुर्ण फळ आहे. ड्रॅगनफ्रुट या फळामध्ये अधिक प्रमाणात उपलब्ध असणारे पोषकतत्व आणि ॲन्टीऑक्सींडंन्टमुळे या फळास सुपर फ्रुट म्हणुन प्रसिध्दी मिळत आहे. तसेच या फळात विविध औषधी गुण आहेत. या व्यतिरीक्त या फळामध्ये फॉस्फरस व कॅल्शीयम या सारखे मिनरल्स अधिक प्रमाणात आढळतात. पाण्याची टंचाई निर्माण झाली तरी ही झाडे कायमची टिकून राहतात. तसेच या पिकामध्ये रोग व किडींचा प्रादुर्भाव नगण्य असुन पिक संरक्षणावर जास्त खर्च येत नाही. भारतीय बाजारपेठेमध्ये या फळाची मागणी वाढत आहे. या फळाचे क्षेत्र, मागणी, निर्यातक्षमता, औषधी व पोषक मुल्य इ. बाबी लक्षात घेवुन सन २०२१-२२ या वर्षापासुन एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत ड्रॅगनफ्रुट लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

**अंमलबजावणीची कार्यपध्दती -**

1. **अर्ज करणे-** ड्रॅगनफ्रुट लागवडीचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी महाडिबीटी या ऑनलाईन संकेतस्थळावर www.mahadbtmahait.gov.in नोंदणी करावी. सोबत स्वत:चा फोटो, 7/12 उतारा, आधार सलग्न राष्ट्रीयकृत बँक पासबुकच्या प्रथम पानाची झेरॉक्स प्रत (फोटोसहीत), आधार कार्ड, जातीचा दाखला (अनु.जाती/अनु.जमाती शेतकऱ्यांसाठी), सामायीक 7/12 उतारा असल्यास इतर खातेदारांचे संमतीपत्र इत्यादी कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावीत.
2. **सोडत काढणे**- महाडीबीटी या ऑनलाईन संकेतस्थळावर ड्रॅगनफ्रुट लागवड या घटकाच्या आर्थिक लक्षांकाप्रमाणे ऑनलाईन सोडत काढण्यात येईल.
3. **पात्रतेचे निकष** - अर्जदाराकडे स्वत:च्या मालकीची किमान 0.20 हे. जमीन असणे आवश्यक आहे. योजनेअंतर्गत ड्रॅगनफ्रुट लागवड पुर्णपणे नव्याने करावयाची आहे. या घटकाअंतर्गत यापुर्वी ड्रॅगनफ्रुटची लागवड केलेल्या क्षेत्रासाठी अनुदान देय राहणार नाही.
4. **कागदपत्रे अपलोड करणे** - सोडतीत निवड झालेल्या शेतकऱ्यांनी हमीपत्र अपलोड करावे.
5. **स्थळपाहणी व पुर्वसंमती देणे-** सोडतीत निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या यादी प्रमाणे कृषि सहाय्यकांमार्फत स्थळपाहणी (प्रपत्र-1) करावी. सदर स्थळपाहणी अहवालात संबंधित शेतकऱ्याने यापुर्वी ड्रॅगनफ्रुट लागवड केली आहे किंवा नाही याची शहानिशा करावी. तसेच, सिंचनाची सोय उपलब्ध आहे किंवा नाही याची पाहणी करावी. स्थळपाहणी अहवालातील कृषि सहाय्यकाच्या शिफारशीनुसार तालुका कृषि अधिकारी यांनी कागदपत्रे छाननी झाल्यानंतर पात्र लाभार्थीस 8 दिवसाच्या आत पुर्वसंमती (प्रपत्र-2) द्यावी.
6. **तांत्रिक व प्रशासकीय मान्यता** - पुर्वसंमती दिल्यानंतर कृषि सहाय्यक यांनी अंदाजपत्रक तयार करावे. मंडळ कृषि अधिकारी यांनी अंदाजपत्रकाची छाननी करून तालुका कृषि अधिकारी यांचेकडे शिफारशीसह मंजुरीसाठी पाठवावे. फळबाग लागवड अंदाजपत्रकास तालुका कृषि अधिकारी हे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देतील.
7. **प्रत्यक्ष कामे करणे-** तालुका कृषि अधिकारी यांची पुर्व संमती प्राप्त झाल्यानंतर शेतकऱ्यांनी ड्रॅगनफ्रुट लागवडची कामे मार्गदर्शक सुचनेप्रमाणे करावीत.

8. **बिले/ देयके अपलोड करणे** - काम पुर्ण झाल्यावर लाभार्थ्याने ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी या संकेतस्थळावर बीले/देयके व फळबाग लागवडीचे फोटो अपलोड करावेत.

9. **मोका तपासणी करणे**- लाभार्थ्याने कामाची बीले/देयके अपलोड केल्यानंतर 8 दिवसांच्या आत मंडळ कृषि अधिकारी यांनी बागेची मोका तपासणी करावी व मापन पुस्तिकेतील नोंदी प्रमाणीत कराव्यात.

10. **अनुदान अदागयी करणे**- सदर मोका तपासणी अहवाल (प्रपत्र-3) मंडळ कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावा. तालुका कृषि अधिकारी यांनी मोका तपासणी अहवालाच्या आधारे जिल्ह्यास अनुदानाकरीता प्रपत्र-4 प्रमाणे तपासून प्रस्ताव सादर करावा.

11. **अर्थसहाय्याचे स्वरूप** - ड्रॅगनफ्रुट फळपिकाच्या लागवडीसाठी प्रति लाभार्थी महत्तम अर्थसहाय्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे. ड्रॅगनफ्रुट फळपिकाची लागवड करण्यासाठी लागवड साहित्य, आधार पध्दत, ठिबक सिंचन, खते व पिक संरक्षण याबाबीकरीता अनुदान देय आहे. याकरीता रक्कम रू. 4.00 लाख प्रति.हे. प्रकल्प खर्च ग्राह्य धरून 40 टक्के अनुदान याप्रमाणे रक्कम रू. 1.60 लाख प्रति.हे. अनुदान देय आहे. सदरचे अनुदान तीन टप्यात - प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष याप्रमाणे 60:20:20 या प्रमाणात देय आहे. दुसऱ्या वर्षी लागवडीच्या 75 टक्के व तीसऱ्या वर्षी 90 टक्के झाडे जिवंत असणे अनिवार्य राहील.

**सर्वसाधारण सुचना -:**

1. कमीत-कमी 0.20 हेक्टर व कमाल 4 हेक्टर क्षेत्रासाठी अनुदान देय राहील.
2. इच्छुक शेतक-यांस योजनेचा लाभ घेण्याकरिता योजनेच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत हमीपत्र (प्रपत्र -5) अर्जासोबत तालुका कृषि अधिकारी कार्यालयास लाभार्थीने देणे आवश्यक आहे.
3. शेतकऱ्यांना द्यावयाची रक्कम ही त्यांनी केलेल्या कामासाठी असून त्यामध्ये लागवड साहित्य, खांब उभारणी, ठिबक सिंचन व पीक संरक्षण या बाबींवर करावयाच्या कामासाठी आहे. त्यामुळे सदरचे निविष्ठा/साहित्य लाभार्थ्यांने स्वत: खरेदी करावयाचे आहे. अनुदान देताना शेतकऱ्यांनी केलेल्या कामाची तपासणी करून व त्याप्रमाणे मापनपुस्तीकेत नोंदी घेवुन अनुदान अदा करावे.
4. योजनेंतर्गत ड्रॅगनफ्रुटची लागवड सलग क्षेत्रावर करणे बंधनकारक राहील.
5. पुर्वसंमती दिल्यानंतर एक महिन्याच्या आत काम सुरू करणे बंधनकारक राहील. काम सुरू न केल्यास पुर्वसंमती रद्द करण्याबाबत तालुका कृषि अधिकारी यांनी कार्यवाही करावी.
6. ड्रॅगनफ्रुटच्या लागवडीकरीता रोपे उपलब्धता पुढील प्राथम्य क्रमाने करावी.

   अ. कृषि विभाग रोपवाटीका

   ब. कृषि विद्यापीठाच्या रोपवाटीका

   क. आयसीएआर संस्था, कृषि विज्ञान केंद्राच्या रोपवाटीका

   ड. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना अंतर्गत ग्रामपंचायतीच्या रोपवाटीका

   इ. सामाजकि वनीकरण किंवा अन्य शासकीय विभांगाच्या रोपवाटीका

   यांच्याकडे उपलब्ध नसल्यास नोंदणीकृत मान्यताप्राप्त खाजगी रोपवाटीकेतून घ्यावीत. खाजगी रोपवाटीकेतुन पुरवठा करण्यात येणाऱ्या रोपांच्या दर्जाबाबत जबाबदारी संधित रोपवाटीका धारकांची राहील. अशा रोपवाटीकामधुन रोपांच्या दर्जाबाबत खातरजमा करून लाभार्थ्यांनी त्याची खरेदी करावी.
7. ड्रॅगनफ्रुटच्या लागवडीसाठी लाभार्थ्यांस सुक्ष्मसिंचन करणे बंधनकारक राहील.

8. लाभार्थींकडे जुने सुक्ष्मसिंचन संच उपलब्ध असल्यास सुक्ष्मसिंचनाचा खर्च वगळुन अंदाजपत्रक तयार करावे. व त्याच्या 40 टक्के प्रमाणे अनुदानाच्या मर्यादेत मापदंडाप्रमाणे अनुदान देय राहील.

9. मापन पुस्तीकेत नोंदीचा दिनांक तसेच राबविलेल्या घटकाची परिपुर्ण माहिती उदा. लाभार्थीचे नाव, क्षेत्र, फळपिकाचे नाव, शेतकऱ्यांनी केलेली कामे, वापरण्यात आलेली सामुग्रीच्या देयकांच्या नोंदी, जिवंत झाडांची टक्केवारी इ. तपशील असणे आवश्यक आहे.

10. प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार मापन पुस्तकात नोंद घेऊन शेतकऱ्याने केलेल्या कामानुसार अनुदान देय राहील. लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करताना वित्तीय नियमावलीचा वापर करावा.

11. लागवड करण्यापूर्वी, लागवडीनंतर फळबागेचा अक्षांश व रेखांशसह संबंधित शेतकऱ्यांसमवेत फोटो घेऊन तो दप्तरी ठेवण्यात यावा.

12. योजनेअंतर्गत शासनाने ठरवून दिलेली खर्च प्रमाणके ही लाभार्थी शेतक-यांस मंजूर असतील व निश्चित केलेल्या खर्चापेक्षा अधिक खर्चाची जबाबदारी लाभ धारक शेतक-याने स्वखर्चातून करण्याची लेखी संमती द्यावी.

13. लाभार्थीस अनुदानाची देय रक्कम त्याच्या नावे बँकेत जमा होणार असल्याने त्याने राष्ट्रीयकृत किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेत खाते उघडणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत खाते क्रमांक व इतर तपशील देणे आवश्यक आहे.

14. लाभार्थीनिहाय प्रस्ताव जोडलेल्या कागदपत्रासह तालुका कृषि अधिकारी यांचे स्तरावर वार्षिक लेखा परिक्षणासाठी जतन करून ठेवावा व तो लेखा परिक्षणावेळी उपलब्ध करून द्यावा.

15. सदर फळपिकाबाबत लागवडीचे तांत्रिक निकष परिशिष्ट-1 मध्ये दिलेले आहेत. तसेच, सदरचे निकष हे मार्गदर्शक स्वरूपाचे असुन स्थानिक परिस्थितीनुसार बदल संभवतो.

16. घटकनिहाय / बाबनिहाय करावयाची कामे व आर्थिक मापदंड याबाबतचा तपशील परिशिष्ट-2,3 व 4 मध्ये दिलेला आहे.

17. योजनेबाबत महाडीबीटी पोर्टलवर सोडतीद्वारे निवड झाल्यानंतर प्रस्तावाचे अर्ज छाननीचे टप्पे व करावयाची कार्यवाही याबाबतची वेळ मर्यादा परिशिष्ट-5 मध्ये देण्यात आलेली आहे.

18. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्यानंतर काही बदल असल्यास वेळेवर कळविण्यात येईल.

# प्रपत्र - 1

## स्थळ पाहणी अहवाल (कृषि सहाय्यक यांनी भरावे)

जा.क्र.
दि.

**प्रति,**
**तालुका कृषि अधिकारी,**
-------------------------

1. शेतकऱ्याचे नाव :
2. गाव: तालुका : जिल्हा :
3. लाभार्थ्याची जमिनधारणेनुसार वर्गवारी :- अत्यल्प / अल्प भूधारक / महिला/ इतर
4. प्रवर्ग :- अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / सर्वसाधारण
5. भूमापन क्र/सर्वे नंबर :
6. 8-अ प्रमाणे एकूण जमीन धारणा:-
7. ड्रॅगनफ्रुट लागवड करावयाचे प्रस्तावित क्षेत्र - हे. आर.
8. फळबागेसाठी उपलब्ध ओलीताचे साधन - विहीर/बोअरवेल/कालवा/---------------

   वरील प्रमाणे तपशील 7/12 चे उताऱ्याप्रमाणे बरोबर आहे.
9. सदर क्षेत्रावर पाहणी करतेवेळी ड्रॅगनफ्रुटची लागवड केलेली आहे किंवा नाही.-------------
10. अक्षांश रेखांश सह फोटो

वरीलप्रमाणे ड्रॅगनफ्रुट लागवड करणे या घटकासंबंधी स्थळ पाहणी करण्यांत आलेली आहे. सदर लाभार्थ्यास त्याच्याकडील उपलब्ध साधन सुविधांचा विचार करून एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत ड्रॅगनफ्रुट लागवड करणे या घटकाचा लाभ देण्यात यावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

**दिनांक:** **ठिकाण:**

**शेतकरी नाव व स्वाक्षरी** **कृषि सहाय्यक**
**गाव --------------------** **गाव --------------------**
**तालुका.---------------** **तालुका.---------------**

प्रत - मंकृअ,---------------------------------------- यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

# प्रपत्र -2

## पुर्वसंमती पत्र

जा.क्र.----------/20 -
तालुका कृषि अधिकारी----
दिनांक :- / /20 -

प्रति,

श्री/सौ.-----------------------,
रा.-----------------------,
ता.-----------जि.------------.

**विषय:- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत ड्रॅगनफ्रुट लागवड करणे या घटकाकरीता पुर्वसंमती देणेबाबत...**

**संदर्भ :- आपला अर्ज दि. -------------.**

उपरोक्त विषयान्वये एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान मध्ये ड्रॅगनफ्रुट लागवड करणे सन 202 - 2 कार्यक्रमांतर्गत आपल्या ------------ हेक्टरच्या प्रस्तावास रक्कम रुपये ------------- (अक्षरी रुपये --------------------- ) रकमेस खालीलप्रमाणे पुर्वसंमती देण्यात येत आहे.

**(रक्कम रु. )**

| अ.क्र. | वाण | क्षेत्र (हेक्टर) | मंजूर रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

ड्रॅगनफ्रुट लागवडीचे बाबनिहाय मापदंड सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. त्याप्रमाणे सदर कार्यक्रम राबविण्यात यावा. लागवड केल्यानंतर मंडळ कृषि अधिकारी यांना अवगत करावे. द्वितीय व तृतीय वर्षात जिवंत झाडांची टक्केवारी विहीत प्रमाणत असल्यासच आपणांस अनुदान देय राहील. जरी आपण एखाद्या बाबींवर प्रमाणकापेक्षा जास्त खर्च केला तरी, मापदंडाप्रमाणे देय रक्कम आपणांस रक्कम अदा केली जाईल.

सोबत - वरीलप्रमाणे

तालुका कृषि अधिकारी
-----------------

प्रत - मंकृअ,-------------------------------------- यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

प्रपत्र - 3

## मोका तपासणी (मंडळ कृषि अधिकारी यांनी भरावे.)

१. शेतकऱ्याचे नाव:

२. गाव: तालुका: जिल्हा:

३. लाभार्थ्याची जमिनधारणेनुसार वर्गवारी :- अत्यल्प / अल्प भूधारक / इतर

४. प्रवर्ग :- अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / सर्वसाधारण

५. भूमापन क्र/सर्वे नंबर:

६. 8-अ प्रमाणे एकूण जमीन धारणा

७. जमिनीचा प्रकार:

८. एकूण योजनेकरिता क्षेत्र- हे. आर.

९. फळबागेसाठी उपलब्ध ओलीताचे साधन
वरील प्रमाणे तपशील 7/12 चे उताऱ्याप्रमाणे बरोबर आहे.

१०. अक्षांश रेखांश सह फोटो (महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करावा)

११. स्थळ पाहणी दिनांक-

१२. ड्रॅगनफ्रुट लागवडीचे काम खालीलप्रमाणे करण्यात आलेले आहे- **क्षेत्र : हेक्टर**
**लागवडीचे प्रथम वर्ष / द्वितीय वर्ष / तृतीय वर्ष**

| अ.क्र. | बाब | अनुज्ञेय/ महत्तम प्रकल्प खर्च (अंदाजपत्रकीय) | अनुज्ञेय/ महत्तम अनुदान मर्यादा (40 टक्के) | प्रत्यक्ष खर्चाची रक्कम (देयकाप्रमाणे) | देय अनुदान (शासकीय अनुदान रक्कम व देयकाची रक्कम यापैंकी जे कमी असेल ते) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | खड्डे खोदणे व खांब उभारणे | | प्रथम वर्ष - -------<br>द्वितीय वर्ष --------<br>तृतीय वर्ष -------- | | |
| 2 | खांबावर प्लेट लावणे | | | | |
| 3 | रोपे लागवड करणे | | | | |
| 4 | ठिबक सिंचन | | | | |
| 5 | खत व्यवस्थापन व पीक संरक्षण | | | | |
| 6 | जिवंत झाडाची टक्केवारी | | | | |
| | **एकुण** | | | | |

वरीलप्रमाणे केलेल्या कामांच्या नोंदी व देयकाच्या नोंदी मापनपुस्तीका क्रमांक -------------------मधील पान क्रमांक ----------------------वर घेण्यात आलेल्या आहेत.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ड्रॅगनफ्रुट लागवड करणे या घटकाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार रक्कम रू.................प्रकल्प् खर्च ग्राह्य धरुन 40 टक्के प्रमाणे (कमाल मर्यादा रू.1.60 लाख) अनुदान रक्कम रू.................... अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

**दिनांक:** **ठिकाण:**

**शेतकरी नाव व स्वाक्षरी**
**गाव** -------------------
**तालुका** ---------

**तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी**
**मंडळ कृषि अधिकारी**----------
**तालुका.**--------------

# प्रपत्र - 4

## ड्रॅगनफ्रुट लागवड घटकाच्या अनुदानासाठी लाभार्थीचा प्रस्ताव तपासण्याकरिता चेकलिस्ट

| अनु.क्र | बाब | तपशिल |
|---|---|---|
| 1 | शेतकऱ्याचा अर्ज | (आहे / नाही.) |
| 2 | 7/12 चा उतारा | (आहे / नाही.) |
| 3 | आधार कार्डाची झेरॉक्स (नसल्यास आधार कार्डाची मागणी केलेल्या पावतीची झेरॉक्स). | (आहे / नाही.) |
| 4 | आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँकेचे खाते पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स फोटोसह | (आहे / नाही.) |
| 5 | हमीपत्र. | (आहे / नाही.) |
| 6 | शेतकरी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील असल्यास वैध अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र/संवर्ग दाखला. | (आहे / नाही.) |
| 7 | स्थळ दर्शक नकाशा | (आहे / नाही.) |
| 8 | चतु:सिमा | (आहे / नाही.) |
| 9 | स्थळ पाहणी प्रपत्र | (आहे / नाही.) |
| 10 | पुर्वसंमती पत्र | (आहे / नाही.) |
| 11 | मोका तपासणी अहवाल. | (आहे / नाही.) |
| 12 | जीएसटीसह बील इनव्हाईस. | (आहे / नाही.) |

प्रपत्र - 5

## ड्रॅगनफ्रुट लागवड करणे या घटकाकरीता अर्थसहाय्य मिळणेबाबत अर्जासोबत द्यावयाचे हमीपत्र

मी अर्जदार **श्री/श्रीमती** ------------------------------------------------, **गाव** --------------------- **ता.** ------------------येथील रहिवाशी शेतकरी असून माझेकडे 8-अ नुसार एकूण ------- हे. क्षेत्र आहे. यापैकी एकूण -------- हे. ---- आर. क्षेत्रावर ड्रॅगनफ्रुट लागवड करणे या घटकाचा लाभ घ्यावयाचा आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या अंमलबजावणी सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र लिहुन देत आहे.

1. या योजनेच्या नियम व अटी मला बंधनकारक राहील व त्यानुसार ड्रॅगनफ्रुट फळपिकाची लागवड करेन. तसेच शासनाने वेळोवेळी केलेल्या नियम व अटींमधील बदल मला मान्य राहतील.
2. या योजनेत भाग घेण्यापुर्वी मी शासनाच्या फळबाग लागवड योजनेखाली----------क्षेत्रावर फळबाग लागवडीचा लाभ घेतलेला आहे.
3. गाव----------------ता----------------जि----------------येथील भूमापनक्र.------------------हे माझ्या मालकीचे-----------------हे.-----------आर. क्षेत्रावर फळबाग लागवड करेल आणि त्याऐवजी अन्य क्षेत्रावर लागवड केल्यास योजनेंतर्गत अनुदानास मी अपात्र राहील.
4. मार्गदर्शक सुचनांनुसार फळबाग लागवडीचे काम पूर्ण झाल्यावर कृषि सहाय्यक व मंडळ कृषि अधिकारी यांना कळविणे माझ्यावर बंधनकारक राहील.
5. फळबाग लागवडीचे काम पुर्ण झाल्यावर व त्याची मंडळ कृषि अधिकारीमार्फत, तपासणी झाल्यानंतर झालेल्या कामाच्या एकूण खर्चाच्या 40 टक्के (विहीत मर्यादेच्या अधिन राहुन) अनुदान मिळणार आहे व यापेक्षा जादाचा होणारा खर्च मी स्वत: करण्यास तयार आहे.
6. योजनेंतर्गत फळबाग लागवड झाल्यानंतर त्याची नोंद सातबारा वर घेण्याची जबाबदारी माझी राहील.
7. खाजगी रोपवाटीकेतुन ड्रॅगनफ्रुट रोपे खरेदी केल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी माझी राहील याची मला जाणीव आहे.
8. सदरच्या लागवड क्षेत्रात ठिबक सिंचन बसविणे अनिवार्य आहे, याची मला जाणीव आहे.
9. फळबाग लागवड केलेल्या बागाचे ठिकाणी संरक्षण, देखभाल, करण्याची पूर्ण जबाबदारी माझी राहील याची मला जाणीव आहे. फळबाग लागवडीनंतर दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी फळझाडांच्या किमान 75 टक्के व 90 टक्के झाडे जिवंत ठेवण्याची जबाबदारी माझी राहील. फळझाडे वरीलप्रमाणे जिवंत राहीली नाहीत तर त्याची संपुर्ण जबाबदारी माझी राहील तसेच, उर्वरीत अनुदान घेण्यास मी पात्र राहणार नाही याची मला जाणीव आहे.
10. सदर फळबाग लागवडीसाठी इतर कोणत्याही शासकीय योजने अंतर्गत यापूर्वी अनुदान घेतले नाही अथवा यापुढे घेण्यात येणार नाही, याची मी हमी देतो.
11. फळबाग लागवडीचे काम विहीत मुदतीत व या आर्थिक वर्षात पूर्ण करणेची जबाबदारी माझी असून फळबाग लागवडीचे काम अर्धवट अवस्थेत राहिल्यास अनुदानास पात्र नसेल, याची मला जाणीव आहे.
12. सदर बागेच्या ठिकाणी/बांधावर एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातंर्गत ड्रॅगनफ्रुट लागवडसाठी अर्थसहाय्य् असे ठळक अक्षरात नमूद करुन लोगोसह बोर्ड लावेल.
13. या योजनेंतर्गत माझ्याकडुन कोणत्याही शासकीय यंत्रणेची फसवणूक झाल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील हे मला ज्ञात आहे.

सदर हमीपत्र मी जाणीवपुर्वक व कोणत्याही दबावाखाली न येता पूर्ण विचारांती करत आहे.

**दिनांक-**

**ठिकाण -** **लाभार्थ्याचे नाव व सही**

**गाव**------------------

# ड्रॅगनफ्रुट लागवड

## अंदाजपत्रक

शेतकऱ्याचे नाव ------------------------------गाव--------------ता------------------जि.--------------

संवर्ग--------------------- भूमापन क्र---------------------- क्षेत्र (हे.)---------------------------------

रोपे संख्या प्रति हे.----------------------------अंतर - मी.X मी.

| अ.क्र. | बाब | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | खड्डे खोदणे व खांब उभारणे | | | | |
| 2 | खांबावर प्लेट लावणे | | | | |
| 3 | रोपे लागवड करणे | | | | |
| 4 | ठिबक सिंचन | | | | |
| 5 | खत व्यवस्थापन व पीक संरक्षण | | | | |
| | **एकुण** | | | | |

**कृषि सहाय्यक** **कृषि पर्यवेक्षक**

## शिफारस प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ.--------------------------------------यांचे भूमापन क्र.------वर--------------- फळपिकाचे लागवडीचे अंदाजपत्रक तांत्रीकदृष्ट्या योग्य असुन आर्थिक मापदंडानुसार बरोबर असल्याची खात्री करण्यात आली आहे. सदर अंदाजपत्रकास तांत्रीक व प्रशासकीय मान्यता देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**मंडळ कृषि अधिकारी**

## तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीचे आदेश.

जा.क्र.----------------------

तालुका कृषि अधिकारी,कार्यालय---------------

दि. / /20

श्री./सौ.--------------------------------------------यांचे भूमापन क्र.-------------------वर---------------------या फळपिकाच्या लागवडीस एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेच्या मार्गदर्शक सुचनेतील नियम व अटींच्या अधीन राहून रक्कम रू.------------------(अक्षरी.---------------------------------------------) तांत्रीक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**तालुका कृषि अधिकारी**

---------------------------------

# परिशिष्ट - 1

## ड्रॅगनफ्रुट लागवड तंत्रज्ञान

**जमीन व हवामान -**

या पिकाची लागवड विविध प्रकारच्या जमिनीमध्ये, जसे की काळी, मुरमाड, कमी खोलीची इत्यादी मध्ये करता येऊ शकते. पाणी साठणा-या जमिनीमध्ये खोडाभोवती जास्त प्रमाणात पाणी साठून राहणार नाही याकरीता योग्य ती काळजी घ्यावी. लागवडीसाठी गादीवाफ्याचा उपयोग करून जास्तीच्या पाण्याचा योग्यरित्या निचरा करू शकतो. जास्त पाणी साठल्याने खोड सडण्याचे प्रमाण आढळून येते तसेच फूल आणि फळांची गळ होते. मातीचा सामु 5.5-6.5 योग्य मानला जातो. तसेच हे फळपीक काही प्रमाणात आम्लयुक्त जमिनीमध्ये सुद्धा योग्य येते.

या फळपिकाची लागवड उष्णकटिबंधीय क्षेत्रामध्ये जिथे पावसाचे प्रमाण खूप आहे अश्या ठिकाणाबरोबरच कमी पावसाच्या क्षेत्रामध्ये लागवड केली जाऊ शकते. समुद्र सपाटीपासून 1700 मिटर उंचीपर्यंत करता येऊ शकते. या पिकासाठी सरासरी वार्षिक 19-33 (किमान-कमाल) सेंटीग्रेड तापमान योग्य मानले जाते यामध्ये वाढ योग्यरित्या होते. पिकांची वाढ, फूल आणि फळ धारणा 20-30 (किमान-कमाल) सेंटीग्रेड तापमानामध्ये योग्य होते. उन्हाळ्यामध्ये जेव्हा दिवसाचे तापमान 40-43 सेंटीग्रेड पर्यन्त पोहचते तेव्हा या पिकामध्ये फांद्यावरती सनबर्न झाल्याचे दिसून येते. परंतु यातून सुद्धा या फळपीकामध्ये तापमान कमी झाल्यावर किंवा काही प्रमाणात पर्जन्यमान झाल्याने झाडांची पुनर्प्राप्ती चांगल्या पद्धतीने होते असे आढळून आले आहे. त्यामुळे अश्या जास्त तापमानामध्ये सुद्धा हे पीक सलग 10 दिवस तग धरू शकते. तसेच बागेमध्ये काही प्रमाणात सावली (20-30%) निर्माण केल्यास फळझाडांचे संरक्षण करता येऊ शकते.

**प्रकार -**

शास्त्रीयदृष्टया ड्रॅगनफ्रूट चे खालील प्रकार लागवडी खाली आहेत.

| अ.क्र. | प्रकार/जाती | फळाच्या सालीचा रंग | फळातील गराचा रंग |
|---|---|---|---|
| 1 | *Hylocereus undatus* | लाल | पांढरा |
| 2 | *H. polyrhizus* | लाल | लाल |
| 3 | *H. megalanthus* | पिवळा | पांढरा |
| 4 | *H. costaricensis* | लाल | लाल-जांभळा |
| ५ | *H. purpusii* | लाल | लाल |

**रोपे तयार करण्याची पध्दत -**

ड्रॅगनफ्रूटची रोपे बियांद्वारे किवा छाट कलम पध्दतीने तयार केली जाऊ शकतात. छाट कलम पध्दतीद्वारे अतिशय जलद गतीने व सोप्या पद्धतीने रोपे तयार केली जातात. एक वर्ष वयाची गडद हिरव्या रंगाची २०-२५ सेमी लांबीची फांदी रोपे तयार करण्यासाठी निवडावी. हलक्या हिरव्या रंगाच्या फांद्यांना मुळे व फूटवे थोडेसे उशिरा येतात. यापेक्षा लहान फांद्या सुद्धा वापरल्या जाऊ शकतात परंतु नर्सरीमध्ये खोडकुज रोगाचा प्रादुर्भावास लवकर बळी पडतात त्यामुळे लहान फांद्या पुर्णपणे काढून फेकून द्याव्या लागतात. म्हणुन योग्य लांबीच्या व एक वर्ष वयाच्या फांद्या वापरल्याने अधिक

फुटवा व मुळांची वाढ चांगली होऊन गुणवत्तेची रोपे तयार करता येतात. निवडलेल्या फांदीवर कोणत्याही प्रकारच्या रोगाची लक्षणे नसावीत जेणेकरून नवीन बागेमध्ये रोगाचे संक्रमण होणार नाही.

निवडलेल्या फांद्या शक्यतो 4-5 दिवसांकरिता सावलीमध्ये सुकण्यासाठी ठेवल्याने कॅलसिंग (Callusing) व्यवस्थित होऊन रोगांचा प्रादुर्भाव होत नाही. फांदी लावण्यापूर्वी फांद्यांना बूरशीनाशकाच्या (उदा. कॉपर ऑक्सी क्लोराइड) द्रावणात बुडवून घ्यावे व पॉलिथीनच्या पिशवीमध्ये (10x25 सेंमी) तसेच गादी वाफा तयार करून रोपण करता येते. गादी वाफ्यावर रोपे बनवण्यासाठी अंदाजित 3फुट रुंद आणि 0.5-1फुट उंच असा गादी वाफा शेणखत मिसळून बनवून घ्यावा. या गादी वाफ्यावर 15-20 सेंमी च्या अंतरावर ड्रॅगनफ्रूट ची कटिंग लावावीत व नियमित अंतराने पाणी देत रहावे. गादी वाफ्यावर रोपे तयार केल्याने पॉलिथीनचा खर्च कमी होऊन खूप सोप्या पद्धतीने ड्रॅगनफ्रूट ची नर्सरी तयार केली जाऊ शकते. 1.5 ते 2 महिन्यानंतर योग्य रोपांची मुख्य जागी पुनर्रोपण करता येऊ शकते. रोपे तयार करण्याची जागा निवडताना जमिनीवर पाणी साठणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच जिथे थोडीफार सावली असेल (20-30 %) अशी जागा निवडावी. लावलेल्या फांद्यांना सहसा 15-20 दिवसामध्ये मुळे येतात व 20-30 दिवसांपासून फूटवे निघायला सुरुवात होते.

**लागवड -**

ड्रॅगनफ्रूटची सर्वसाधारणपणे मान्सूनपूर्व लागवड केली जाते. सिंचनाची सोय असल्यास ड्रॅगनफ्रूटची लागवड वर्षभर करता येऊ शकते. अतिउष्ण महीने शक्यतो टाळावेत. ड्रॅगनफ्रूट हे वेलवर्गीय फळपीक असून पिकाच्या वाढीसाठी लागवडीपूर्वी आधारप्रणाली उभारणे आवश्यक आहे. यामध्ये आरसीसी सीमेंट खांबांचा उपयोग केला जातो. आरसीसी सीमेंट खांबांचे आकारमान खालीलप्रमाणे असावे -

**आ. खांबाचे आकारमान**

- उंची - 6 ते 7 फुट
- रूंदी/जाडी - 4 इंच
- वजन - 40-45 किलो


खांबाच्या मधोमध 1 इंच व्यासाची लोखंडी सळी (रॉड) बसवावी. सदरची लोखंडी सळी (रॉड) खांबाच्या वर 5 सेंमी असावी जेथे प्लेट ठेवता येईल.

**ब. प्लेटचे आकारमान -** चौकोनी अथवा गोलाकार

- चौकोनी प्लेट- लांबी, रुंदी व जाडी - 60 x 60 x 5 सेंमी
- प्लेटचे वजन - 15-25 किलो



**खांबांच्या टोकावरती काढलेले रॉड्स**



**चौकोर प्लेटचे नमुने**

**लागवडीचे अंतर -:**

ड्रॅगन फ्रुट रोपांच्या लागवडीकरीता 4.5 मी x 3 मी, 3.5 मी x 3 मी , 3 मी x 3 मी अंतर अनुज्ञेय आहे. 60 x 60 सें.मी. लागवडीकरीता आकारमानाचे खड्डे खोदुन घ्यावेत. खड्डा खोदुन झाल्यावर खड्ड्याच्या मधोमध 1 फुट खाली व 5/6 फुट जमिनीच्या वर अशा पध्दतीने सीमेंट कॉंक्रेटचे खांब उभे करावेत. प्रति खड्डा 10-15 किलो कुजलेले शेणखत मिसळून वाफे बनवून घ्यावेत. पाऊस झाल्यानंतर रोपांची लागवड करावी. रोपांची लागवड करताना, रोपे खांबाच्या जेवढ्या जवळ लावता

येतील तेवढी जवळ लावावीत जेणेकरून नवीन फुटवा खांबाला योग्य रीतीने बांधता येईल. खांबाच्या चारही बाजूंना एक एक रोप लावावे, म्हणजे एका खांबाजवळ 4 रोपे लावली जातील याप्रमाणे 4.5 x 3 मी. अंतराकरीता हेक्टरी 2960 रोपे लागतील.

## बागेमधील व्यवस्थापन

### आ. मंडप उभारणी व छाटणी -

लागवड केल्यानंतर, रोपास येणारे नवीन फुटवे खांबालगत सुतळीच्या सहाय्याने बांधावेत व या फुटव्यांना खांबाच्या टोकावरती बसवलेल्या चौकोणी किंवा गोलाकार प्लेटच्या छिद्रांमधून वाढू द्यावे. सुरुवातीच्या काळामध्ये सुधारात्मक छाटणी करावी ज्यामधे आडवे वाढणारे किंवा जमिनीच्या दिशेने वाढणारे फूटवे शक्य तितक्या लवकर काढून टाकावेत. सरळ वाढणा-या फांद्या खांबाच्या टोकावर असणा-या प्लेटपर्यंत पोहचल्यावर जास्तीत जास्त प्रमाणात परंतु योग्य फुटव्यांना वाढू द्यावे जेणेकरून अधिक प्रमाणात फळ धारणा होईल. शक्यतो प्लेटच्या छिद्राजवळ फांद्यांचा गुच्छ तयार होणार नाही याची खबरदारी घ्यावी. रोगट तसेच उन्हापासुन करपलेल्या (सनबर्न) फांद्यांची छाटणी करावी. प्रत्येक वर्षी अनावश्यक फांद्यांची निर्जंतुक केलेल्या कटर्सने किंवा कात्रीने छाटणी करून बुरशीनाशकाची फवारणी करावी. प्लेटमधुन जमीनीकडे वाढलेल्या फांद्यांचा योग्य वाढीनंतर शेंडा कापला असता फांदीवर अधिक प्रमाणात फूटवे निघण्यास मदत होते. फळांची तोडणी झाल्यानंतर फांद्यांची छाटणी करावी जेणेकरून झाडांची निगा व्यवस्थितरीत्या राखता येते.

### ब. पाणी व्यवस्थापन -

ड्रॅगन फ्रुट निवडुंगवर्गीय असल्याने इतर फळपिकांपेक्षा पाण्याची आवश्यकता ही खूप कमी प्रमाणात आहे. पावसाळयामध्ये लागवड केल्यानंतर नियमित पाऊस असेल तर खते देणे व्यतिरिक्त पाण्याची आवश्यकता खूप कमी लागते. परंतु हिवाळा व उन्हाळा या दोन ऋतु मध्ये नियमित अंतराने आवश्यकते नुसार पाणी द्यावे. परंतु पाण्याची मात्रा एकवेळेस खूप जास्त राहणार नाही याची दक्षता घ्यावी. योग्य वाढ झालेल्या बागेमध्ये एप्रिल व मे महिन्यामध्ये पाण्याचा योग्य ताण दिल्याने अधिक प्रमाणात फूलधारणा होण्यास मदत होते. पावसाळ्यामध्ये जास्त प्रमाणात बागेत पाणी साठणार नाही याची काळजी घेण्यात यावी. ड्रॅगनफ्रूट ची मुळे खूप जास्त खोलवर जात नसल्याने सूक्ष्म सिंचन प्रणालीचा वापर फायदेशीर ठरतो.

### ख.खत व्यवस्थापन

ड्रॅगनफ्रूट पिकाची मुळे जास्त खोलवर जात नसल्यामुळे या पिकास अधिक प्रमाणात खते एकावेळी देण्याचे टाळावे. लागवडीपूर्वी वाफे तयार करताना १०-१५ किलो शेणखत प्रती खांब व ५०-१०० ग्राम डीएपी खांबाच्या चारही बाजूला एकसारखे टाकावे. जमिनीच्या मगदुरानुसार व उपलब्ध अन्नद्रव्यानुसार खतांचे प्रमाण निश्चित करावे. भाकृअनूप-राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्था, बारामती यांनी खडकाळ जमिनीमध्ये ड्रॅगनफ्रूट साठी ५००:५००:३०० ग्राम (नत्र:स्फुरद:पालाश) ची मात्रा पहिल्या व दुस-या वर्षात चार भागांमध्ये व तिस-या वर्षी ८००:९००:५५० ग्राम (नत्र:स्फुरद:पालाश) ची मात्रा सहा भागांमध्ये (फळांची तोडणी झाल्यानंतर, फूल धारणे पूर्वी, फूल धारणे पश्च्यांत, फळ धारणेच्या वेळी व फळ वाढीच्या वेळी दोन वेळा) विभाजीत करून दयावीत अशी शिफारस केली आहे. योग्य वाढ झालेल्या झाडांना दरवर्षी १५-२० किलो शेणखत दिले जावे. खते सूक्ष्म सिंचन प्रणालीचा वापर करून दिल्याने खतांचा अपव्यय टाळता येतो व पुरेपूर वापर होतो.

## ड. रोग व कीड व्यवस्थापन

ड्रॅगनफ्रूटमध्ये खूप कमी प्रमाणात रोग व कीटकांचा प्रादुर्भाव होतो. परंतु काही बागांमध्ये खोडकुज,क्यँकर,अन्थ्रॅक्नोज सारखे रोग व् फळमाशी सारखे कीटक आढळून येतात. यासाठी बागेमध्ये एकात्मिक रोग व किड व्यवस्थापन खूप महत्वाचे आहे. यामध्ये निरोगी रोपे निवडणे, छाटणीनंतर बुरशींनाशकांची फवारणी, छाटणीसाठी निर्जंतुक केलेल्या कात्री वापरणे, उन्हाळयामध्ये झाडांचे अतिउन्हापासून संरक्षण करणे हे रोग नियंत्रणासाठी, व फळमाशी सापळे, बागेतील वाळलेल्या गवताची योग्य त्या पध्दतीने विल्हेवाट लावणे व आवश्यकतेनुसार योग्य कीटकनाशकांचा वापर करणे किड नियंत्रणासाठी फायदेशीर ठरते. तसेच ड्रॅगनफ्रुट मध्ये वाळवीचा प्रादुर्भाव काही भागांमध्ये आढळून आला आहे त्यासाठी योग्य कुजेलेले शेणखत वापरावे, तसेच प्रादुर्भाव आढळून आल्यास कीटकनाशक उदा. क्लोरपायरीफॉस चा योग्य प्रमाणात वापर करावा (२ मिली प्रती लीटर प्रमाणात, २०ईसी).

**फळधारणा -**

ड्रॅगनफ्रुटच्या बागेचे योग्य व्यवस्थापन केल्यास सर्वसाधारणपणे एका वर्षानंतर फुल आणि फळधारणा होण्यास सुरवात होते. साधारणपणे तिसऱ्या वर्षा पासून अधिक उत्पादन मिळण्यास सुरुवात होते. याची फुले आकाराने मोठी, पांढ-या रंगाची आणि संध्याकाळी-रात्री उमलणारी असतात. पाऊस सुरू झाल्यावर फुले येण्यास सुरवात होते. ड्रॅगनफ्रूटमध्ये जुन पासून ऑक्टोंबर-नोव्हेंबर पर्यन्त फुले येतात. परागीकरणापासून साधारणपणे एक ते सव्वा महिन्यात फळाची वाढ पुर्ण होते. या पिकामध्ये काही प्रमाणात Self-incompatibility आढळून येत असल्यामुळे फळधारणा होण्याकरिता प्रभावी परागीकरण होणे खूप महत्वाचे असते. यासाठी रोपण करताना मिश्र प्रजाती एकत्रितपणे लागवड केल्याने अधिक फायदेशीर ठरते.

**उत्पादन -**

उत्तम व्यवस्थापन व योग्य नियोजन असलेल्या बागांमध्ये सर्वसाधारणपणे पहिल्या वर्षापासून फुल/फळधारणा पाहायला मिळते. परंतु तिस-या वर्षापासून उत्पादन मिळण्यास सुरुवात होते. फळांची तोडणी जून-जुलै पासून सुरू होऊन डिसेंबर-जानेवारी पर्यंत केली जाते. सरासरी उत्पादन १०-१२ टन प्रती हेक्टर असते. व्यवस्थापन योग्य ठेवल्याने हे उत्पादन वाढून प्रती हेक्टरी १६-२५ टनापर्यंत जाते.

**फळाची प्रतवारी (वजनानुसार)**

| अ.क्र. | ग्रेड/आकार | फळाचे वजन (ग्रॅम) |
|---|---|---|
| १ | अति मोठे | >350 |
| 2 | मोठे | 250 ते 350 |
| 3 | मध्यम | 200 ते 250 |
| 4 | लहान | 150 ते 200 |

## परिशिष्ट - 2

| एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ड्रॅगन फ्रुट लागवड | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आर्थिक मापदंड ( प्रति हे. ) | | | | | |
| प्रति हे. रोपे संख्या: 2960 (अंतर 4.5 मी. x 3 मी.) | | | | | |
| अ.क्र | बाब | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकुण |
| 1 | 60 x 60 x 60 सेंमी आकाराचे खड्डे 4.5 x 3 मी अंतरावर खोदणे (एकुण खड्डे संख्या - 740) व आधाराकरीता काँक्रीट खांब उभारणे. खांब संख्या 740 (किंमत रु 390 प्रति खांब व प्लेट) | 185000 | 0 | 0 | 185000 |
| 2 | खांबावर प्लेट लावणे.(प्लेट संख्या - 740) | 0 | 103600 | 0 | 103600 |
| 3 | रोपे लागवड करणे. एकुण रोपे संख्या 2960 (किंमत रु 15 प्रति रोप) | 44400 | 0 | 0 | 44400 |
| 4 | ठिबक सिंचन (संदर्भ-प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना) | 43332 | 0 | 0 | 43332 |
| 5 | खत व्यवस्थापन व पिक संरक्षण | 6000 | 8000 | 9668 | 23668 |
| एकुण खर्च | | 278732 | 111600 | 9668 | 400000 |
| देय अनुदान | | 96000 | 32000 | 32000 | 160000 |

## परिशिष्ट - 3

| एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ड्रॅगन फ्रुट लागवड | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आर्थिक मापदंड ( प्रति हे. ) | | | | | |
| प्रति हे. रोपे संख्या: 3808 (अंतर 3.5 मी. x 3 मी.) | | | | | |
| अ.क्र | बाब | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकुण |
| 1 | 60 x 60 x 60 सेंमी आकाराचे खड्डे 3.5 x 3 मी अंतरावर खोदणे (एकुण खड्डे संख्या - 952) व आधाराकरीता काँक्रीट खांब उभारणे. खांब संख्या 952 (किंमत रु 390 प्रति खांब व प्लेट) | 238000 | 0 | 0 | 238000 |
| 2 | खांबावर प्लेट लावणे.(प्लेट संख्या - 952) | 0 | 133280 | 0 | 133280 |
| 3 | रोपे लागवड करणे. एकुण रोपे संख्या 3808 (किंमत रु 15 प्रति रोप) | 57120 | 0 | 0 | 57120 |
| 4 | ठिबक सिंचन (संदर्भ-प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना) | 36029 | 0 | 0 | 36029 |
| 5 | खत व्यवस्थापन व पिक संरक्षण | 7718 | 10291 | 12437 | 30446 |
| एकुण खर्च | | 338867 | 143571 | 12437 | 494875 |
| देय अनुदान | | 96000 | 32000 | 32000 | 160000 |

## परिशिष्ट - 4

| एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ड्रॅगन फ्रुट लागवड | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आर्थिक मापदंड ( प्रति हे. ) | | | | | |
| प्रति हे. रोपे संख्या: 4444 (अंतर 3 मी. x 3 मी.) | | | | | |
| अ.क्र | बाब | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकुण |
| 1 | 60 x 60 x 60 सेंमी आकाराचे खड्डे 3 x 3 मी अंतरावर खोदणे (एकुण खड्डे संख्या - 1111) व आधाराकरीता कॉंक्रीट खांब उभारणे. खांब संख्या 1111 (किंमत रु 390 प्रति खांब व प्लेट) | 277750 | 0 | 0 | 277750 |
| 2 | खांबावर प्लेट लावणे.(प्लेट संख्या - 1111) | 0 | 155540 | 0 | 155540 |
| 3 | रोपे लागवड करणे. एकुण रोपे संख्या 4444 (किंमत रु 15 प्रति रोप) | 66660 | 0 | 0 | 66660 |
| 4 | ठिबक सिंचन (संदर्भ-प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना) | 42034 | 0 | 0 | 42034 |
| 5 | खत व्यवस्थापन व पिक संरक्षण | 9008 | 12010 | 14515 | 35533 |
| **एकुण खर्च** | | **395452** | **167550** | **14515** | **577517** |
| **देय अनुदान** | | **96000** | **32000** | **32000** | **160000** |

(डॉ.के.पी.मोते)

**संचालक**

**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे**